S.N.D.T. Women's University Library
Date..............
Pune-38.

## -: ऋ ण नि र्दे श :-

गिरिधरांच्या साहित्याचा प्रस्तुत अभ्यास हातावेगळा करताना मन सारखे अुचंबळून येते. प्रस्तुत निबंधाचा अभ्यास करताना ज्या मातापित्यांनी लहानपणापासून माझ्या मनावर शिक्षणाचे संस्कार घडविले, त्यांचे स्मरण होणे स्वाभाविकच आहे. किंबहुना, त्यांच्याच प्रेरणेने मी हा अभ्यास करू शकले, नाहीतर काही कौटुंबिक अडचणीमुळे त्यावेळच्या अिंग्रजी पाचव्या अियत्तेतून शाळा सोडून नंतर बाहेरून क्रमाने सर्व परीक्षा देत देत येथपर्यन्त येवून पोहोचणे शक्य झाले नसते. त्यासाठीच माझे पूज्य पिता ती.बा.ना.मोठसागर व मातोश्री ती.अुमाबाअी मोठसागर ह्यांच्या पुण्य स्मृतीस आदरांजली वाहते.

माहेर धुळ्यासच असल्यामुळे लहानपणी समर्थ व समर्थसंप्रदाय यांच्यासाठी सर्व आयुष्य वाहून घेतलेल्या समर्थभक्त के.शं.श्री.अुर्फ नानासाहेब देव यांचे मला अनेकदा दर्शन घडले. त्यांना पाहून आपणही काही साहित्यविषयक काम करावे, ही सुप्त अिच्छा मनात तेव्हाच अुत्पन्न झाली. पुढे सासरी आल्यावर त्या सुप्त बीजांकुराला नवीन प्रेरणा मिळाली. घरातील अनेक ग्रंथ पाहून, मधून मधून अनेक विचारतरंग मनात अुमटत परंतु प्रकृतीच्या अडचणी व काही मानसिक ताण यांमुळे अनेक वर्षे हातून काहीच झाले नाही. तथापि अधूनमधून मूळ प्रेरणा अुफाळून येअी; आणि अभ्यासाला थोडी चालना मिळे. त्यांत प्रमुख म्हणजे माझे गुरुजी डॉ.हे.वि.अिनामदार ह्यांच्याकडून सतत मिळणा-या प्रोत्साहनामुळेच, लग्न झाल्यावर सतरा वर्षांनी अेम.अे.ची परीक्षा मी दिली, आणि प्रस्तुत प्रबंध सादर करण्यापर्यन्त मजल गाठली.

लहानपणापासून घरी मातोश्रींच्या वाचनात येणा-या संतांच्या वाङ्मयामुळे तेव्हाच संतवाङ्मयाची आवड निर्माण झाली होती. त्याच वाङ्मयाचा अभ्यास करावा ह्या अिच्छेला ख-या अर्थाने आकार मिळाला, तो माझे पती डॉ.मु.श्री. कानडे यांच्या प्रेरणेने. समर्थ रामदास हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. समर्थ-शिष्य श्री गिरिधरस्वामी हा माझ्या संशोधनाचा विषय ठरावा, हा योगायोगही सुखद आहे.

माझे मार्गदर्शक डॉ. हे.वि.अिनामदार हेही थोर संतवाङ्मयाभ्यासक असल्यामुळे त्यांनी या विषयाच्या निवडीस आनंदाने संमती दिली. डॉ.अिनामदार यांचे वेळोवेळी अुचित मार्गदर्शन मिळाल्यामुळे व अनेक प्रापंचिक अडचणी असूनही प्रबंध-लेखन पूर्ण झाले, त्याबद्दलची कृतज्ञता शब्दांनी व्यक्त करता येणार नाही.

म.म.श्री सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी परमार्थपर काव्याबद्दल अनेक मार्गदर्शन केले, त्याबद्दल त्यांची सदैव ऋणी राहणे मला आवडेल. गिरिधरांच्या अलंकार योजनेची चर्चा करताना प्रा.भालचंद्र खांडेकर यांनी ज्या अुपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल त्यांचेही आभार मानणे अगत्याचे आहे.

कै.देवांनी धुळ्याच्या श्रीवाग्देवता मंदिरात ठेवलेल्या गिरिधरांच्या वाङ्मयसंभाराचा मुक्तहस्ताने वापर करण्याची संधी तेथील चालकांनी दिल्यामुळे मला गिरिधरांच्या अप्रकाशित पोथ्या नकलून घेता आल्या. ह्या कामी माझे भाऊ, भावजय व बहीण चित्याळे कुटुंबियांनी अतिशय मदत केली, याचा आवर्जून अुल्लेख केला पाहिजे.

पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ.म.प.पेठे यांनी जरूर ते संदर्भसाहित्य तत्परतेने अुपलब्ध करून दिले, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. बीड येथील गिरिधरस्वामींच्या समाधीचे छायाचित्र, मंगळवेढा महाविद्यालयातील प्रा.विद्यासागर पाटंगणकर यांच्या आपुलकीच्या सहकार्यामुळे मिळू शकले. त्यांचे आभार मानणे अवश्य आहे.

आमच्याकडे येणा-या सर्वच शिष्टमित्रांनी माझ्या अभ्यासकार्यात सदैव पाठराखणीच केली, त्याबद्दल त्यांचीही मी ऋणी आहे.

केवळ योगायोग म्हणूनच समर्थांच्या निर्याणाच्या त्रिशताब्दी अुत्सवात त्यांच्या प्रशिष्याच्या साहित्याचा अभ्यास माझ्या हातून व्हावा याबद्दल मला अत्यंत धन्यता वाटते ही प्रेरणा समर्थांचीच, असे मी मानते !

श्रीज्ञानदेव पुण्यतिथी, )
दि. २४ नोव्हेंबर, १९८१. ) सौ. शकुंतला मु.कानडे